# जाहिरात

## वैद्यकीय प्रशासन अधिकारी, यांचे कार्यालय,

## राज्य कामगार विमा योजना (महा. शासन) विदर्भ विभाग, इमामवाडा, नागपूर- ३

## कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांची थेट मुलाखतीद्वारे पदभरती

वैद्यकीय प्रशासन अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या निवड समितीद्वारे वैद्यकीय प्रशासन अधिकारी महा.राकावि सोसायटी वि.वि. नागपूर या कार्यालयाचे अंतर्गत खालील सेवा दवाखान्याकरीता वैद्यकीय अधिकारी (गट -अ) ची एकुण ०९ व वैद्यकीय अधिकारी गट – ब ची एकुण ०६ रिक्त पदे कंत्राटी वैद्यकीय अधिकारी म्हणुन कंत्राटी पध्दतीने फक्त ११ महिन्याच्या कालावधीसाठी निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन भरावयाची आहेत.

| अ.क्र. | कार्यालयाचे / सेवा दवाखान्याचे नाव | पदनाम | रिक्त पद संख्या | उमेदवाराचा प्रवर्ग | किमान शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|---|
| १ | सेवा दवाखाना बल्लारपुर, जि. चंद्रपुर | **वैद्यकीय अधिकारी गट-अ** | १ | १ आर्थिक दुर्बल घटक | **एम.बी.बी.एस** |
| २ | सेवा दवाखाना कळमेश्वर जि. नागपूर | | २ | १ अ.जा., १ इमाव | |
| ३ | सेवा दवाखाना उमरेड, जि. नागपूर | | २ | १ अ.जा, १ सा.शै.मा. | |
| ४ | सेवा दवाखाना वरोरा जि. चंद्रपुर | | २ | १ अ.ज., १ भज क | |
| ५ | सेवा दवाखाना तिरोडा जि. गोंदिया | | २ | १ अराखीव, १भजड | |
| ६ | सेवा दवाखाना कुकडे ले आऊट जि. नागपूर | **वैद्यकीय अधिकारी गट - ब** | १ | १ आर्थिक दुर्बल घटक | |
| ७ | सेवा दवाखाना पाचपावली जि. नागपूर | | १ | १ इमाव प्रवर्ग | |
| ८ | सेवा दवाखाना सोमवारीपेठ जि. चंद्रपुर | | १ | १ खुला प्रवर्ग | |
| ९ | सेवा दवाखाना बगडगंज जि. नागपूर | | १ | १ अजा प्रवर्ग | |
| १० | सेवा दवाखाना बुटीबोरी क्र. ०१ जि. नागपूर | | १ | १ खुला प्रवर्ग | |
| ११ | सेवा दवाखाना बुटीबोरी क्र. ०२ जि. नागपूर | | १ | १ खुला प्रवर्ग | |

१) सदर कंत्राटी वैद्यकीय अधिकारी नियुक्ती संबंधाने किमान शैक्षणिक अर्हता एम.बी.बी.एस. ही राहील. उमेदवाराचे वय दिनांक ०१.०७.२०२५ रोजी ५७ वर्षापेक्षा जास्त नसावे.

२) कंत्राटी पध्दतीने निवड करण्यात आलेल्या वैद्यकीय अधिकारी (गट -अ) यांना शासन निर्णय दि. २९.०५.२०२० नुसार दरमहा मानधन दिले जाईल.

३) सदर कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांची नियुक्ती ११ महिन्यांसाठी किंवा सदर पदावर एम.बी.बी.एस. अर्हता धारक नियमित वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होईल त्या दिनांकापासुन यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंतच राहील.

४) सदर कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांची नियुक्ती निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात असल्याने त्यांना नियमित वैद्यकीय अधिकाऱ्यांसारखे म.ना.से.निवृत्तीवेतन, म.ना.से. (रजा) नियम लागु राहणार नाहीत. तसेच ते विमा योजना, भविष्य निर्वाह निधी अथवा तत्सम कोणतेही सेवा विषयक इतर लाभ मिळण्यास पात्र राहणार नाहीत. त्यांना वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय राहणार नाहीत.

५) सदर कंत्राटी नियुक्ती केवळ तात्पुरत्या स्वरूपाची असल्याने त्यांना सदर पदावर भविष्यात कायम करण्यात येणार नाही व त्या पदावर त्यांचा धारणाधिकार असणार नाही.

६) कंत्राटी स्वरूपात तात्पुरती नियुक्ती दिलेल्या उमेदवारांची भविष्यात विहित मार्गाने नियमित पदावर नियुक्ती झाल्यास सदरची तात्पुरती सेवा त्यांच्या नियमित सेवेस जोडून दिली जाणार नाही.

७) केवळ तात्पुरती कंत्राटी नियुक्ती दिलेल्या उमेदवारांची कंत्राटी सेवा अर्हताकारी सेवा म्हणुन गणण्यात येणार नाही किंवा सेवा ज्येष्ठता व अन्य कोणत्याही प्रकारच्या सेवाविषयक बाबीसाठी ग्राहय धरली जाणार नाही.

८) सदर कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांनी सेवेत असतांना गैरवर्तन/गैरव्यवहार केल्याचे निर्दशनास आल्यास कोणतीही पुर्वसूचना न देता त्यांच्या सेवा तात्काळ समाप्त करण्यात येतील. त्यांना पुन्हा नियुक्ती देण्यात येणार नाही.

९) सदर कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांना सेवाकाळात सेवामुक्त व्हावयाचे असल्यास त्यांना एक महिन्याची नोटीस किंवा एक महिन्याचे मानधन भरून कार्यमुक्त होता येईल.

१०) निवड झालेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी मुख्यालयी राहणे बंधनकारक असेल.

११) वरील सर्व अटी शर्ती मान्य असल्याबाबत रू. १००/- चे स्टॅम्पपेपरवर करारनामा करण्यात येईल.

सदर पदभरती संबंधाने विहित नमुन्यात भरलेले अर्ज साक्षांकित कागदपत्रांसह **दि. १०.०६.२०२५**पर्यंत वैद्यकीय प्रशासन अधिकारी यांचे कार्यालय, राज्य कामगार विमा योजना (महाराष्ट्र शासन) वि.वि. आयसोलेशन हॉस्पीटल जवळ, इमामवाडा नागपूर -४४०००३ या कार्यालयात स्विकारले जातील. अर्जाचा विहित नमुना या कार्यालयातुन किंवा संकेतस्थळावरून प्राप्त करून घ्यावा. शासन आदेशाच्या अधिन राहुन मुलाखत वैद्यकीय प्रशासन अधिकारी कार्यालय, राज्य कामगार विमा योजना (महाराष्ट्र शासन) आयसोलेशन हॉस्पीटल जवळ, इमामवाडा, नागपूर या कार्यालयात **दिनांक १३.०६.२०२५ रोजी सकाळी १२.३० वाजता** आयोजित करण्यात येईल.

तरी इच्छुक अहर्ताधारक उमेदवारांनी थेट मुलाखतीकरीता नमुद दिनांक व वेळेत या कार्यालयात उपस्थित राहावे. उमेदवारांनी येतांना सोबत शैक्षणिक अर्हतेचे सर्व मुळ दस्तऐवज, वैद्यकीय परिषदेचे नोंदणी प्रमाणपत्र, वयाचा दाखला, अनुभव प्रमाणपत्र अलीकडील पासपोर्ट साईजचा फोटो व इतर आवश्यक प्रमाणपत्रांची मुळ व छायांकित प्रतीचा एक संच, फोटो असलेले ओळखपत्र इ. सोबत घेऊन येणे आवश्यक आहे.

अनाधिकृत गैरहजर असलेल्या / संपामध्ये सहभागी असलेले /शासन सेवेत शिस्तभंग कार्यवाहीकरीता काढुन टाकलेले वैद्यकीय अधिकारी यांना अर्ज करता येणार नाही. तथापी पदभरती बाबत निवड समितीचा निर्णय अंतीम राहील.

**वैद्यकीय प्रशासन अधिकारी**

**महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटी, नागपूर ४४० ००३**